# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२५**

**सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय मागण्या**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**सोमवार, दिनांक १७ मार्च, २०२५**

## सामान्य प्रशासन विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - ४**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: ए-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २०५१, लोकसेवा आयोग**<br>**रूपये:- २,०००/-**<br>**श्री. अस्लम शेख** |
| (१) | १४६ | १० | महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या ( एम. पी. एस. सी. ) वर्ष २०२२ मध्ये राज्यसेवा २०२२ मध्ये तहसीलदार, नायब तहसीलदार, उपजिल्हाधिकारी आदी संवर्गातील ६२३ जागांसाठी मुख्य परीक्षेच्या निकालानंतर दि. ३० नोव्हेंबर, २०२३ ते १८ जानेवारी, २०२४ च्या कालावधीत सात टप्प्यांमध्ये एका पदासाठी ३ उमेदवार प्रमाणात मुलाखती झालेली निवड यादी दि. २७ सप्टेंबर, २०२४ मध्ये प्रसिद्ध होणे, सन २०२३ मध्ये राजपत्रित व अराजपत्रित यंदाच्या २०२५ परिक्षेत उत्तीर्ण झालेले राज्यभरातील सुमारे २५ हजाराहून अधिक उमेदवार आजवर नियुक्तीच्या प्रतिक्षेत असल्याचे दि. २१ फेब्रुवारी, २०२५ मध्ये निदर्शनास येणे, महाराष्ट्र राज्यसेवा परीक्षा २०२३ मध्ये ३०३ जागांसाठी. मुख्य परीक्षा व चार टप्प्यात मुलाखती होऊन दि. १३ ऑगस्ट, २०२४ चा पहिला दिवस तर २४ सप्टेंबर, २०२४ चा शेवटचा टप्पा पार पाडून दि. २६ सप्टेंबर, २०२४ मध्ये गुणवत्ता यादी प्रसिद्ध करण्यात आली. मात्र अंतिम यादी तसेच नियुक्त्या करण्यात आलेल्या नसणे, मागील दोन वर्षामध्ये विविध ३५ संवर्गासाठी अन्न-सुरक्षा अधिकारी पदाच्या २०२ जागांसाठी आणि मेट्रोलॉजी विभागाच्या ८३ जागांच्या परीक्षा झाल्यानंतर निकालच्या मुलाखतीही पूर्ण झालेल्या असणे, सन २०२३ मध्ये तलाठी यांच्या ४,३०० जगांसाठी ११ लाख तर अराजपत्रित वर्गातील लिपिक संवर्गाच्या ७,५०० जागांसाठी ३.५० लाखांवर उमेदवारांनी २०२३ मध्ये पूर्व परीक्षा देऊन निकाल लागल्यानंतर एकास तीन उमेदवारांची कौशल्य चाचणी घेण्यात आलेल्या उमेदवारांना सेवेत नियुक्ती मिळालेली नसणे, परिणामी अनेक उमेदवारांचे नोकरीचे वय शासनाच्या निष्काळजीपणामुळे निघून जात असल्याने पूर्व व मुख्य परीक्षांचा अडथळा दूर करण्यासाठी लाखो तरुण-तरुणी बेरोजगारांवर तसेच राज्यभरातील २५ हजार गुणवंत बेरोजगारांचे शैक्षणिक भवितव्यास निर्माण झालेली सांशकता, त्यामुळे राज्यातील तमाम बेरोजगारांमध्ये निर्माण झालेली चीड व असंतोषाची भावना, सदर प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: ए-४**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २०७०, इतर प्रशासनिक सेवा**<br>**रूपये:- २,४७,६०,४७,०००/-**<br>**श्री. सुनिल प्रभू** |
| (२) | २६६ | १०० | महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाकडून पोलीस उपनिरीक्षक आणि इतर अराजपत्रीत गट-ब आणि गट-क पदांसाठी भरतीची अधिसूचना सुमारे ९ महिने विलंबाने आल्याने अनेक पात्र उमेदवारांची वयोमर्यादा उलटून त्यांची नोकरीची संधी गमावल्याने यामध्ये सुमारे ५० हजार तरुण उमेदवारांच्या नोकऱ्या धोक्यात असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (३) | १८८ | १० | राज्यात सद्या सरकारी अधिकारी/ कर्मचारी यांची जवळपास ३५% पदे रिक्त असणे, शासकीय अधिकारी/कर्मचारी नजीकच्या काळात सेवानिवृत्त होत असून रिक्त पदांचा आकडा अजून वाढण्याची परिस्थिती उद्भवत असणे, सेवेत कार्यरत असलेल्या शासकीय अधिकारी /कर्मचारी यांच्यावर कामाचा ताण वाढत जाणे, केंद्र शासकीय अधिकारी/ कर्मचारी तसचे देशातील इतर २५ राज्यातील शासकीय अधिकारी /कर्मचारी यांच्या सेवानिवृत्तीचे वय ६० असणे, त्याच धर्तीवर महाराष्ट्र राज्यातील शासकीय अधिकारी/कर्मचारी यांचे सेवानिवृत्तीचे वय ५८ वरुन ६० करावे अशी अनेक वर्षापासून मागणी असणे. याबाबत लवकरच सकारात्मक निर्णय घेण्यात येईल असे तत्कालीन मुख्यमंत्री यांनी अधिकारी/ कम्रचारी संघटनेला आश्वासन दिले असणे, तथापि ३ वर्ष उलटूनही सदर आश्वासनाची पूर्तता झाली नसणे, शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांच्या सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे करण्याची मागणी केली असणे, ३५% रिक्त पदे भरण्याची कार्यवाही लवकर होईल असे अपेक्षित नसणे, त्यामुळे, शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवानिवृत्तीचे वय ६० झाल्यास शासनाला अनुभवी अधिकारी/ कर्मचारी यांच्या सेवा अधिक २ वर्ष उपलब्ध होणे, या रास्त मागणीबाबत शासनस्तरावरुन या अधिवेशनात सकारात्मक निर्णय घेण्याची गरज असणे, याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी कर्मचारी व अधिकारी यांच्यात निर्माण झालेली असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: ए-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२३५, सामाजिक, सुरक्षा व कल्याण**<br>**रूपये:- ३,४२,६१,०३,०००/-**<br>**श्री. अस्लम शेख** |
| (४) | १८९ | १० | राज्यातील जेष्ठ नागरिकांना विविध सवलती देण्यात येत असणे, मात्र रेल्वेच्या स्लीपर क्लास, वातानुकूलित वर्ग-२ व वातानुकूलित वर्ग-३ या वर्गमधून प्रवास करणा-या जेष्ठ नागरिकांनी रेल्वे टिकीट दरातील सवलत रेल्वे प्रशासनाने कोविड-१९ पासून बंद केली असणे, टिकीट दरातील सवलत पुन्हा सुरू करण्याची |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | आवश्यकता निर्माण झाली असणे. जेष्ठ नाकरिकांना तिकीटात ४० टक्के सवलत देण्यासंदर्भात महाराष्ट्र शासनाने केंद्र शासन व रेल्वे प्रशासनाकडे पाठपुरावा करण्याची नितांत आवश्यकता असणे याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी जेष्ठ नागरिकात निर्माण झालेला तीव्र असंतोष व शासना प्रती निर्माण झालेली चिडीची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : १३ मार्च, २०२५**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) सामान्य प्रशासन विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई